माझे कुटुंब माझी जबाबदारी

# आरोग्य विभाग, जिल्हा परिषद पालघर

फोन नं. ०२५२५/२०५४२० ई.मेल-dhopalghar@gmail.com

जा.क्र./पाजिप/आवि/आस्था -०५/२०२४/539/२०२४ दिनांक- ०६/१२/२०२४

प्रति,
श्री..........................................
.......................................................

विषय :- जिल्हा परिषद, पालघर अंतर्गत आरोग्य सेवक ५०% करिता हंगामी फवारणी अनुभव धारण न करणा-या उमेदवारांची दिनांक ०९/१२/२०२४ रोजीची कागद पडताळणी आदेश रद्द करणे बाबत.

संदर्भ :- १.ग्रामविकास व पंचायतराज विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई पत्र क्र. पदभ- ३१२४/प्र.क्र. २५२/ आस्था- ८, दि. १५/१०/२०२४

२. या कार्यालयाचे पत्र क्र. जिपपा/आरोग्य/आस्था ०५/५३२/२०२४,दिनांक २९/ ११/ २० २४

३. अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. संकिर्ण- २०२४/ प्र.क्र. ३३४/आस्था-८, दिनांक ०२ डिसेंबर, २०२४.

उपरोक्त विषयान्वये जिल्हा परिषद, पालघरची पदभरती करिता जाहिरात दि. ०५ ऑगस्ट २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यांत आली होती. सदर जाहिरातीत सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, पालघर कडील आरोग्य सेवक -५०% या संवर्गातील एकुण ५३ रिक्त पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती.

त्या अनुषंगाने, जिल्हा परिषद, पालघर अंतर्गत आरोग्य सेवक -५०% या सवंर्गाच्या रिक्त पदासाठी दि. २९/०८/२०२४ रोजी IBPS कंपनीकडून घेण्यात आलेल्या ऑनलाईन लेखी परीक्षेद्वारे प्राप्त गुणांच्या आधारे तसेच हंगामी फवारणी कर्मचारी अनुभवधारक उमेदवारांची यादी या कार्यालयास प्राप्त झालेली आहे.

तथापि, ग्रामविकास व पंचायतराज विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई पत्र क्र. पदभ- ३१२४ /प्र.क्र. २५२/आस्था-८, दि.१५/१०/२०२४ ऑनलाईन लेखी परिक्षेत किमान गुण मिळवून गुणवत्ता यादीत स्थान मिळालेल्या हंगामी फवारणी कर्मचारी अनुभवधारक उमेदवारांची सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०४/०५/२०२२ मधील तरतुदीनुसार कागदपत्र पडताळणी करुन पात्र उमेदवारांना आरोग्य सेवक (पुरुष) ५०% (हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी) या संवर्गात प्रथम नियुक्ती दयावी तसेच हंगामी फवारणी कर्मचारी अनुभव धारण न करणा- या तथापि लेखी परिक्षेत उच्च गुणवत्ता धारण करणा-या उमेदवारांची स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करुन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०४/०५/२०२२ मधील तरतुदीनुसार गुणवत्तेनुसार नियुक्तीची कार्यवाही करावी असे कळविलेले होते.

त्या अनुषंगाने, सदंर्भ क्र. ०३ दिनांक २९/११/२०२४ रोजीच्या पत्रान्वये हंगामी फवारणी अनुभव धारण न करणा-या उमेदवारांना दिनांक ०९/१२/२०२४ रोजी कागदपत्रे पडताळणी कामी जिल्हा परिषद, पालघर येथे बोलविण्यात आलेले होते. परंतू संदर्भ क्र. ०३ अन्वये शासनाच्या दिनांक १५/१०/२०२४ रोजीच्या पत्रास दिनांक २७/११/२०२४ आदेशान्वये स्थगिती दिलेली असल्याने सर्व उमेदवारांना कळविण्यात येते की, या कार्यालयाकडील दिनांक २९/११/२०२४ रोजीचे पत्र रद्द करण्यात येत असुन, दिनांक ०९/१२/२०२४ रोजीचे कागद पडताळणी करिता करण्यात आलेले नियोजन रद्द करण्यात येत आहे. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

प्रत :-१. मा. अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, पालघर तथा जिल्हाधिकारी, पालघर यांना माहितीसाठी सविनय सादर
२. सदस्य, जिल्हा निवड समिती, पालघर तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पालघर
३. सदस्य, जिल्हा निवड समिती, पालघर तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.), जि.प.पालघर.

Scanned with OKEN Scanner